प्रशासनाला सहकार्य करा आणि कोरोनावर मात करा!!



पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

www.dainikhindusthan.com
marathe_vinod1@rediffmail.com

अफवांवर विश्वास ठेवू नका प्रशासनाला सहकार्य करा!!



■ वर्ष ७० वे/अंक २२२ वा ■ ■ अमरावती, बुधवार दिनांक १ एप्रिल २०२० ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर ११ चैत्र १९४२ ■ ■ पृष्ठे ८ ₹ ४.००

## सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन दोन टप्प्यात वेतनात कपात नाही: अजित पवार



मुंबई दि. ३१ : करोना संकटाच्या पार्श्वभूमीवर राज्यासमोरील आव्हाने लक्षात घेऊन लोकप्रतिनिधी तसेच शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे मार्च महिन्याचे वेतन दोन टप्प्यात देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भातील शासन निर्णय जारी करण्यात आला असून लोकप्रतिनिधी आणि शासकीय कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणतीही कपात करण्यात आलेली नाही. सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांचे संपूर्ण देय वेतन दोन टप्प्यात मिळेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना दिली आहे.

राज्याच्या वित्त विभागाने आज जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील 'अ' आणि 'ब' वर्गातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना मार्च महिन्यासाठी देय वेतनाच्या ५० टक्के रक्कम पहिल्या टप्प्यात मिळेल. 'क' वर्गाच्या कर्मचाऱ्यांना ७५ टक्के वेतन पहिल्या टप्प्यात मिळेल. 'ड' वर्गाच्या कर्मचाऱ्यांच्या आणि सेवानिवृत्तीधारकांना पूर्ण वेतन मिळेल. या सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या वेतनात कोणतीही कपात करण्यात आलेली नाही. या सर्वांचे उर्वरीत *(उर्वरित पान २ वर)*

## राज्यात २४ तासांत ७७ नवे करोनाग्रस्त; रुग्णसंख्या ३०० पार

मुंबई दि. ३१ : राज्यातील करोनाग्रस्तांचा आकडा वाढतच आहे. मुंबईसह संपूर्ण राज्यात गेल्या २४ तासांत ७७ नव्या रुग्णांची नोंद झाली असून, एकूण आकडा ३०२वर पोहोचला आहे. एकट्या मुंबई आणि परिसरात ५९ रुग्ण सापडले आहेत.

करोनाचा संसर्ग वाढत असून, मुंबईत गेल्या २४ तासांत ५९ रुग्णांची नोंद झाली आहे. तर राज्यात एकूण ७७ नव्या रुग्णांची भर पडली



आहे. त्यामुळं राज्यातील करोनाग्रस्तांचा आकडा ३०२वर पोहोचला आहे. मात्र, आज संध्याकाळपर्यंत करोनाग्रस्तांची एकूण संख्या ही २३० होती. मग अचानक ७२ नवे करोना रुग्ण आले कुठून, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे ही आकडेवारी खरी आहे, असं सांगितलं जात आहे. खासगी रुग्णालयांमधील दाखल रुग्णांचे अहवाल प्राप्त झाले आहेत आणि त्यांना करोनाची लागण झाल्याचं स्पष्ट झालं आहे, असं सूत्रांकडून सांगितलं जात आहे.

## कुणाचाही पगार कापला जाणार नाही हे माझं आश्वासन : मुख्यमंत्री



मुंबई दि. ३१ : लॉकडाउनचा सातवा किंवा आठवा दिवस निघून गेला ती कल्पनाही आलेली नाही. लढाई अजूनही सुरु आहे. जसे जसे दिवस जात आहेत तसे आपण आपली पकडही मजबूत करत आहोत. हाच तो काळ आहे ज्या काळात करोनाचा विषाणू गुणाकार सुरु करतो. आपण सगळे त्याला धैर्याने तोंड देत आहेत ही कौतुकाची बाब आहे. आपली लढाई अजून संपलेली नाही असं मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून त्यांनी जनतेशी संवाद साधला. आधीच करोनाचं संकट आहे आणि आज दुपारी अशी समजूत झाली की अनेकांचे पगार कापण्यात आले.

मात्र आज मी तुम्हाला ग्वाही देतो की कुणाचाही पगार कापला जाणार नाही. फक्त काही टप्प्यांमध्ये त्याची विभागणी होणार आहे. वेतन कपातीबाबत कोणताही निर्णय झालेला नाही असंही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी स्पष्ट केलं आहे.

## दर तासाला ९ नवे रुग्ण, भारतात करोनाचा धोका वाढला; रुग्णांची संख्या १२५१

नवी दिल्ली दि. ३१ मार्च : भारतात कोरोनाव्हायरस रुग्णांची संख्या झपाट्याने वाढते आहे. गेल्या २४ तासांत तब्बल २२७ नवे रुग्ण आढळून आलेत. याचाच अर्थ दर तासाला ९ रुग्ण आढळत आहेत. त्यामुळे भारताचा धोका आता वाढला आहे.

देशातील एकूण रुग्णांची संख्या आता १२५१ वर पोहोचली आहे. सोमवारी राजस्थान, हरियाणा, पश्चिम बंगाल आणि उत्तर प्रदेशसह देशाच्या विविध भागांत कोरोना विषाणूची नवीन प्रकरणे समोर आली आहेत. दिवसभरात ३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. गुजरात, पश्चिम बंगाल आणि मध्य प्रदेशातील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे.

देशातील सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात आहेत. सोमवारी महाराष्ट्रात २१६ लोक संसर्गित झाले आहेत. राज्यात आतापर्यंत १० लोकांचा मृत्यू झाला आहे, तर ३९ लोकांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. सोमवारी महाराष्ट्रात दोन लोकांचा मृत्यू झाला, त्यापैकी एकाचा मृत्यू पुण्यात आणि दुसरा मृत्यू हा मुंबईत झाला.

देशभरात सध्या दिल्लीच्या निजामुद्दीन येथील तब्लिगी जमात परिषदेमुळे भीतीचे वातावरण आहे. १३ ते १५ मार्च दरम्यान फक्त देशातील विविध राज्यांमधूनच नव्हे तर परदेशातूनही लोकं हजर होते. भारत आणि परदेशातील लोकांसह एकूण १८३० लोक या परिषदेसाठी उपस्थित होते. १५ मार्चनंतर तब्बल १४०० लोकं दिल्लीमध्ये होते. आतापर्यंत ३०० लोकांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या परिषदेतून बाहेर पडलेल्या ६ जणांचा तेलंगणात तर कर्नाटक, जम्मू काश्मीर आणि मुंबईत प्रत्येकी एक अशा ९ जणांचा मृत्यू झाला आहे. तर दिल्ली रुग्णालायत असणाऱ्या *(उर्वरित पान २ वर)*

## वृत्तपत्र व्यवसायाला सहाय्य करा

नवी दिल्ली दि. ३१ : कोरोना विषाणूच्या उद्रेकामुळे अर्थव्यवस्था खिळखिळी होत आहे. त्यामुळे वृत्तपत्रांना जाहिराती मिळणे अवघड झाले आहे. देशव्यापी लॉकडाऊनमुळे वृत्तपत्र मुद्रण आणि वितरणातही मोठ्या समस्या निर्माण झाल्या आहेत. या अनपेक्षित स्थितीमुळे वृत्तपत्र व्यवसाय कोलमडण्याच्या स्थितीत आला असून त्याला सरकारकडून उभारी मिळण्याची अत्याधिक आवश्यकता आहे. याचा विचार करून या व्यवसायाला अर्थसाहाय्य *(उर्वरित पान २ वर)*

## खा. नवनीत राणांनी दिला एक कोटीचा निधी

### एक महिन्याचे वेतन देखील दिले : कोरोनाच्या लढाईत मोलाची भूमिका



अमरावती,दि.३१ (प्रतिनिधी): खासदार नवनीत रवी राणा यांनी कोरोना विषाणूच्या लढाईत मोलाची भूमिका बजावित त्यांच्या निधीतून केंद्र सरकारला तब्बल एक कोटी रूपये दिले आहेत. याशिवाय त्यांनी त्यांचे एक महिन्याचे खासदार मानधन देखील दिले आहे.

खासदार नवनीत रवी राणा यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी व लोकसभा अध्यक्षा ओमजी बिरला यांना यासंबंधीचे पत्र पाठवून माहीती दिली आहे. कोरोना महामारीची गंभीरता लक्षात घेता २४ मार्च ते १४ एप्रील असे २१ दिवस रक्षात्मक लॉक डाऊन करण्यात आले आहे. आपण अमरावतीचे लोकप्रतिनिधीत्व करतांना या संकटसमयी आपण देशासाठी एक कोटी रूपयाचा निधी व एक महिन्याचे वेतन देत असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. दरम्यान, आपण आपल्या कार्यक्षेत्रात गरीबांना भोजन प्रदान करीत असून बेघरांना केंद्र व राज्य सरकारच्या निर्देशानुसार मदत करीत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## निजामुद्दीनमधील ४४१ जणांमध्ये करोनाची लक्षणं

नवी दिल्ली दि.३१ : करोना व्हायरसचा वाढता प्रादुर्भाव रोखण्यासाठी सोशल डिस्टन्सिंगचं आवाहन सर्वच पातळ्यांवरून करण्यात येतंय. पण दिल्लीच्या निजामुद्दीन भागातील तबलिग जमातच्या मरकजमधून आतापर्यंत १५४८ जणांना बाहेर काढण्यात आलं आहे. बाहेर काढण्यात आलेल्यांपैकी ४४१ जणांमध्ये करोनाची लक्षणं आढळून आल्याची माहिती दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी दिलीय. दिल्लीत आतापर्यंत ९७ करोना पॉझिटिव्ह आढळून आले आहेत. यापैकी २४ जण हे मरकजमधील आहेत. ५ जणांना उपचारानंतर घरी सोडण्यात आलंय. तर दोघांचा मृत्यू झाला आहे.

**मरकज प्रकरणी केजरीवाल नाराज**

आतापर्यंत करोनाचे जे रुग्ण आढळून आले ते विदेशातून आले होते किंवा त्यांच्या संपर्कत *(उर्वरित पान २ वर)*

## करोना: दूध उत्पादकांसाठी सरकारचा 'लाख'मोलाचा निर्णय

मुंबई दि.३१ : 'करोना' संकटाच्या पार्श्वभूमीवर दूध उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकार शेतकऱ्यांकडून दररोज दहा लाख लिटर दूधाची २५ रुपये प्रतिलिटर दराने खरेदी करणार आहे. येत्या चार-पाच दिवसात हे संकलन सुरू होणार असून 'करोना'चा प्रादुर्भाव संपेपर्यंत पुढचे दोन महिने ही खरेदी सुरू राहणार आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेल्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. 'करोना' प्रादुर्भावामुळे राज्यातील दूधव्यवसाय, दूध उत्पादक शेतकरी संकटात आहे. दूधविक्री घटल्यामुळे गावागावात दूध स्वीकारले जात नाही. राज्यात उत्पादित १२ लाख लिटर दूधापैकी १० हजार लिटर दूध अतिरिक्त ठरत आहे. खासगी बाजारात दूधाचा *(पान २ वर)*

## मुख्यमंत्र्यांसह सर्व लोकप्रतिनिधींच्या वेतनातही ६० टक्के कपात

मुंबई, दि. ३१ : 'कोरोना'च्या प्रादुर्भावामुळे निर्माण झालेल्या आरोग्य व आर्थिक परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्याच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांपासून, विधीमंडळाचे सर्व सदस्य तसेच स्थानिक स्वराज संस्थांच्या सदस्यांपर्यंत सर्व लोकप्रतिनिधींच्या मार्च महिन्याच्या वेतनात ६० टक्के कपात करुन त्यांना ४० टक्के वेतन देण्यात येणार आहे.

'कोरोना'चं संकट आणि 'टाळाबंदी'मुळे राज्याच्या आर्थिक उत्पन्नात झालेली घट लक्षात घेऊन तसेच 'कोरोना'विरुद्धच्या लढ्याला नैतिक आणि आर्थिक बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे तसेच राज्यातील सर्व स्थानिक स्वराज संस्थांचे अध्यक्ष, पदाधिकारी, सदस्य तसेच राज्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी या निर्णयाला पाठिंबा, सहकार्य देतील, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, कोरोना व्हायरस देशात फैलाव वाढत आहे. आज लॉकडाउनचा ७ वा दिवस आहे, परंतु संक्रमित लोकांची संख्या वाढतच आहे. आरोग्य मंत्रालयाच्या ताज्या आकडेवारीनुसार भारतात संक्रमित लोकांची संख्या आतापर्यंत १२५१ वर पोहोचली आहे. त्यापैकी १११७ सक्रिय प्रकरणे आहेत, तर ३२ लोकांचा कोरोनाने बळी गेला आहे. मात्र, १०२ जणांनी या आजारावर मातही केली आहे.

## मोदींच्या आईंनी पीएम केअर्स फंडाला दिली २५ हजाराची देणगी



अहमदाबाद दि. ३१ : करोना व्हायरसच्या संकटाचा मुकाबला करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या पंतप्रधान केअर्स फंडाला नरेंद्र मोदी यांच्या आई हिरा बेन यांची २५ हजार रुपयांची देणगी दिली आहे. त्यांनी आपल्या बचतीमधून ही रक्कम पंतप्रधान फंडाला दिली आहे. सरकारी सूत्रांनी मंगळवारी ही माहिती दिली. एनडीटीव्हीने हे वृत्त दिले आहे.

हिरा बेन ९८ वर्षांच्या असून त्या *(उर्वरित पान २ वर)*

## फेक न्यूज रोखा अन्यथा करोनाच्या भीतीनेच अधिक बळी जातील: सुप्रीम कोर्ट



नवी दिल्ली दि. ३१ : करोना व्हायरस संदर्भात देशातील प्रत्येक क्षणाची माहिती नागरिकांना मिळाली पाहिजे. यासाठी २४ तासांच्या आत वेबसाइट सुरू करून त्यावर क्षणोक्षणाची माहिती अपडेट करावी. तसंच फेक न्यूजमुळे नागरिकांचा गोंधळ उडतोय. या फेक न्यूजवर तातडीने आळा घाला, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने आज केंद्र सरकारला दिले.

करोना व्हायरस पेक्षा त्याच्या भीतीनेच नागरिकांचे बळी जातील. यामुळे फेक न्यूज पसरवणाऱ्यांवर कडक कारवाई करावी आणि अशा प्रकारांना आळा घालावा, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने केंद्र सरकारला दिले. स्थलांतर करणाऱ्या मजूर आणि कामगारांसाठी देशात ठिकठिकाणी शिबिरं आणि निवासाची व्यवस्था करावी. तसंच या कामगारांची समजूत घालण्यासाठी आणि त्यांना शांत करण्यासाठी *(पान २ वर)*

## अमेरिकेतील बळींची संख्या ३००० पार



न्युयॉर्क दि. ३१ : करोनाने अमेरिकेत थैमान घातलं असून मृतांचा आकडा तीन हजाराच्या पार गेला आहे. अमेरिकेतील परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत चालली असून रुग्णांच्या उपचारासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. रुग्णांची संख्या वाढत चालली असल्याने आरोग्य व्यवस्थेवर ताण पडत असून नौदलाचं १००० बेड्सचं जहाज (USNS Comfort) न्यूयॉर्कमध्ये दाखल झालं आहे. गव्हर्नर या जहाजाच्या स्वागतासाठी हजर होते.

जहाजावरील रुग्णालयात पूर्ण वैद्यकीय सुविधा पुरवल्या जाणार असून सर्जरीदेखील केली जाणार आहे. शिवाय आयसीयू आणि वॉर्डची सुविधा असणार आहे. यामुळे *(उर्वरित पान २ वर)*

## माहोल....




तुम्ही बॉस म्हणुन किती ग्रेट आहात हे घरी वर्क फ्रॉम होम केल्यावर समजले!!!

## बँकांचे एकत्रीकरणाचा ग्राहकांवर 'हा' परिणाम होणार

मुंबई दि. ३१ : करोना रोखण्यासाठी टाळेबंदी सुरु असली तरी सार्वजनिक क्षेत्रातील १० बँकांचे ४ बँकांमध्ये होणारे एकत्रीकरण उद्या म्हणजे १ एप्रिलपासून अंमलात येणार आहे. मोठ्या बँकामध्ये विलीन होणाऱ्या उर्वरित बँकांमधील ग्राहकांना खाते क्रमांक किंवा कस्टमर आयडी नव्याने दिला जाण्याची शक्यता आहे.

देशात जागतिक दर्जाच्या बँक स्थापन व्हाव्यात यासाठी केंद्र सरकारने १० बँकांच्या एकत्रीकरणाची योजना डिसेंबर २०१८ मध्ये सादर करण्यात आली होती. त्याला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. नियोजित वेळेनुसार १० ऐवजी ४ बँका उद्यापासून कार्यरत होतील. रिझर्व्ह बँकेने जारी केलेल्या जाहिरातीनुसार, अलाहाबाद बँकेच्या सर्व शाखा १ एप्रिल २०२० पासून इंडियन बँकेमध्ये विलीन करण्यात येणार आहेत. याशिवाय आंध्र बँक आणि कॉर्पोरेशन बँकेच्या सर्व शाखा १ एप्रिल २०२०पासून युनियन बँक ऑफ इंडियाच्या शाखा म्हणून कार्यरत राहणार आहेत.

या एकत्रीकरणाच्या पूर्वसंध्येला आज बँकांच्या वरिष्ठ व्यवस्थापनाने व्हिडीओ कॉन्फरन्सने कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. यात विभागीय अधिकाऱ्यांना विशेष सूचना देण्यात आल्या. एकत्रीकरणाचे बदल ग्राहकांपर्यंत सोशल मिडीयाचा वापर करुन पोहचवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दरम्यान, या एकत्रीकरणांनंतर ग्राहकांना नव्याने खाते क्रमांक किंवा कस्टमर आयडी दिला जाण्याची शक्यता आहे. त्याशिवाय ज्यांची एसआयपी सुरु आहे किंवा ज्यांचे कर्जाचे हप्ते सुरु आहेत त्यांना नवीन इंस्ट्रक्शन फॉर्म भरावा लागण्याची शक्यता आहे. याशिवाय नवीन चेकबुक, डेबीट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड इश्यू केले जाऊ शकते.

## १५ एप्रिलपासून रेल्वे बुकिंगला सुरुवात



नवी दिल्ली दि. ३१ : करोनाच्या पार्श्वभुमीवर बंद करण्यात आलेल्या रेल्वेच्या बुकिंगला १५ एप्रिलपासून सुरुवात होणार आहे. आयआरसीटीसी ॲप आणि वेबसाईटवर १५ एप्रिलपासून प्रवासाची तिकिटं उपलब्ध असणार आहेत. करोनाचा वाढता फैलाव रोखण्यासाठी २४ मार्चला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशभरात २१ दिवसांसाठी लॉकडाउन जाहीर केला. १४ एप्रिलपर्यंत हा लॉकडाउन असणार आहे. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून रेल्वेच्या बुकिंगला सुरुवात होणार आहे. राजस्थान पत्रिकाने यासंबंधी वृत्त दिलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लॉकडाउनची घोषणा केल्यानंतर देशभरातील मेट्रो, रेल्वे आणि बस सेवा पूर्णपणं बंद करण्यात आली होती. भारतीय रेल्वेनेही यानंतर १४ एप्रिलपर्यंत सर्व प्रवासी ट्रेन सेवा बंद करत असल्याचं जाहीर केलं होतं. फक्त मालवाहतूक करणाऱ्या ट्रेन सुरु ठेवण्यात आल्या होत्या. पण आता रेल्वेकडून १५ एप्रिलपासून बुकिंगला सुरुवात करत असल्याचं जाहीर करण्यात आलं आहे.